CCPS An AIChE Technology Alliance
Center for Chemical Process Safety
www.aiche.org/ccps

Process Safety Beacon
१० वा वर्धापन दिन
http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx
उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश

या आवृत्तीचे प्रायोजक
ioMosaic
www.iomosaic.com

# मी काय करू शकतो? मी साधा ऑपरेटर आहे!

सप्टेंबर २०१२



कामगारांकडून नेहमी एक टिप्पणी केली जाते. "माझ्या प्रक्रीयेतील सुरक्षा सुधारण्यासाठी मी काय करू शकतो? मी साधा कामगार (किंवा टेक्निशियन, मेकॅनिक इ.) आहे. मी फक्त वॉल्व्ह उघडतो, यंत्रे चालवतो, नमुने गोळा करतो, पान्हे फिरवतो यंत्रे नियोजित करतो. हे खरे आहे की कामगार रसायनशास्त्र बदलू शकत नाहीत, यंत्रे पुनर्अभिकल्पित करू शकत नाहीत किंवा यंत्राच्या बांधणीचे सामान बदलू नाहीत. तथापि त्यांना प्रक्रीयेची उत्तम जाण असते. प्रक्रीया कशी चालते, यंत्रे कशी बिघडतात, आणि कोणत्या परिस्थितीत प्रक्रीया उत्तम चालते हे त्यांना माहित असते.

योगी बेरा एक बेसबॉल खेळाडू होता जो म्हणाला, "तुम्ही नुसते पाहूनही खूप निरीक्षण करू शकता." प्रक्रीया सुरक्षेबाबत हे सत्य आहे! पाहून आणि ऐकूनही तुम्ही खूप काही शिकू शकता. अनियमित आवाज यंत्रातील संभाव्य बिघाड दर्शवू शकतात. जमिनीवरील किंवा पाइपलाइनवरील एक खराब किंवा ओला डाग एखाद्या लहान गळतीची समज देऊ शकतात. आपणा सर्वांना माहीत आहे की यंत्रांतील बिघाड किंवा गळती आपोआप त्यांची तीच दुरूस्त होत नाहीत. जे तुम्ही पहाता त्याची माहिती द्या, दुरूस्तीचे काम द्या किंवा तुमच्या पर्यवेक्षकास सांगा.

सोबतची छायाचित्रे काही समस्यांची उदाहरणे आहेत जी तुम्हाला तुमच्या कारखान्यातही आढळू शकतील















← वीज आणि वाहिन्यामधील समस्यांकडे लक्ष द्या.

## आपण काय करू शकता?

- आपल्या प्रक्रीया आणि यंत्रांची माहिती करून घ्या. ते यंत्र कसे चालावयास हवे तसेच ते नीट चालत नसल्याचे कसे ओळखावे ते समजून घ्या.
- अनियमित गोष्टींच्याबाबत जागरूक रहा – आवाज, गंध, ठिबकणे, गळती, व्हायब्रेशन. जर काही विपरीत होत असेल तर कोणाला तरी सांगा.
- तपासणी पत्रक अचुकपणे भरा. जरी एखादी समस्या त्या पत्रकावर अनेक महिने नमूद केली जात असेल तरी पुन्हा नमूद केल्याची खात्री करा आणि ही समस्या किती काळापासून प्रलबित आहे ते वरीष्ठांच्या निदर्शनास आणा.
- सुरक्षेबाबतच्या समस्या त्वरित कळवा – जसे गहाळ गार्ड, बोल्ट, किंवा पाइपलाइच्या हॅंगर्समुळे गंभीर इजा होऊ शकते किंवा त्याचे पर्यवसान गळती, आग, किंवा अगदी मोठ्या दुर्घटनेत होऊ शकते.
- खात्याची मिटींग आणि सुरक्षा मिटींगचा वापर सुरक्षेबाबतच्या चिंताजनक गोष्टी उपस्थित करण्यासाठी करा आणि इतरांच्या उपस्थित समस्या ऐकून घ्या.
- तुमची भूमिका निभावा. उदाहरणार्थ, जेंव्हा कार्यपध्दतींचा किंवा निर्धारित बदलांचा आढावा घ्यायला सांगितला असेल तर तुमच्या जीवनाशी निगडीत असल्याप्रमाणे करा. असे होऊ शकते!

**प्रक्रीया सुरक्षा प्रत्येकावर अवलुबून असते!**

AIChE © 2008. सर्व हक्क राखीव. अव्यावसायिक, शैक्षणिक हेतूसाठी वापरण्यास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणासही पुनर्विक्रीसाठी वापर करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क : ccps_beacon@aiche.org किंवा ६४६–४९५–१३७१

हे बीकॉन सहसा अफ्रीकन, अरेबिक, चिनी, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, गुजराती, हिब्रू, हिंदी, हंगेरियन, इंडोनेशियन, इटालियन, जपानी, कोरियन, मालय, मराठी, नॉर्वेजियन, पर्शियन, पोलीश, पोर्तुगीज, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तमिळ, थाई, तेलगू, तुर्की, उर्दू आणि व्हीएतनामी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे.

This Beacon is translated in Marathi by Mr. S.K. Gulawani, Maharashtra, India.